सन २०१८-१९ च्या टंचाई कालावधीत ग्रामीण तसेच नागरी भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घेण्यात आलेल्या उपाययोजनांवरील खर्च भागविण्यासाठी अनुदान वितरीत करण्याबाबत (आर्थिक वर्ष २०१९-२०).

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांकः टंचाई २०१९/प्र.क्र. १३१ /पापु-१४
गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल, लोकमान्य टिळक मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: ०५ जुलै, २०१९

वाचा :-

१) शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांकः टंचाई १०९९/प्र.क्र.१२/पापु-१४, दिनांक ३ फेब्रुवारी, १९९९.
२) शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांकः टंचाई २००८/प्र.क्र.१४९/पापु-१४, दिनांक २१ ऑगस्ट, २००९
३) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र.१३१/पापु-१४ दिनांक २० जून, २०१९
४) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांचे क्रमांक : मजीप्रा/वित्त-२/निधी/८०/२०१९, दिनांक २७ जून, २०१९

शासन शुध्दीपत्रक :-

शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक : टंचाई २०१९/प्र.क्र.१३१/ पापु-१४, दिनांक २० जून, २०१९ मधील शासन निर्णयात अनुक्रमांक- ११ पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आला आहे.

" या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना मुक्त करण्यात आलेला निधी रुपये २१८३.०० लाख (एकूण एकवीस कोटी त्र्याऐंशी लाख फक्त) याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे संचालक (वित्त) (श्री. यशवंत बाबुराव पाटील) यांच्या स्वाक्षरीने तयार केलेले देयक अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई यांना सादर करण्यात यावे. संचालक (वित्त), (श्री. यशवंत बाबुराव पाटील) यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. "

वरील परिच्छेदाऐवजी परिच्छेद क्रमांक -११ पुढीलप्रमाणे राहील.

" या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना मुक्त करण्यात आलेला निधी रु. २१८३.०० लाख (एकूण एकवीस कोटी त्र्याऐंशी लाख फक्त) याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे संचालक (वित्त) (श्री. यशवंत बाबुराव पाटील) यांच्या स्वाक्षरीने तयार केलेले व सह सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (श्री. म. बा. हजारी) यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले देयक अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई यांना सादर करण्यात यावे. संचालक (वित्त), (श्री. यशवंत बाबुराव पाटील) यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच सह सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, (श्री.म. बा. हजारी) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे ".

३. याबाबतचा खर्च प्रस्तुत शासन निर्णयातील निधी वितरण बाबतच्या विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे "मागणी क्र. सी-६, २२४५ -नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१-अवर्षण, १०२-पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, (९१)-राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१) (०१) पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (२२४५ ००९३) (दत्तमत)(वेतनेत्तर) ३१, सहायक अनुदाने" या उपलेखाशीर्षा उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागवावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर प्रकरणी वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक : अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४ /अर्थ-३, दिनांक ०१/०४/२०१९ अन्वये प्रशासकीय विभागास दिलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन शुध्दीपत्रकाचा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०७०५१३१०३६३२२८ आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA
BHASKAR KUMATGI

Digitally signed by RAJENDRA BHASKAR KUMATGI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=96d578360190574be078f90f44cde8446df6e461003bf3672f18f9dbab1603da, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=48c4e0a537923a17a2d48380c158034caa0569bf9dce61f86ab5a8724cddfebe, ou=WATER SUPPLY AND SAINITAION, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAJENDRA BHASKAR KUMATGI
Date: 2019.07.05 14:58:36 +05'30'

(राजेंद्र कुमटगी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

३. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव (ग्रा.वि.), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
५. सचिव, महसूल (मदत व पुनर्वसन) विभाग, मंत्रालय मुंबई.
६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई,
७. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
८. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
९. विभागीय आयुक्त (सर्व)
१०. जिल्हाधिकारी (सर्व)
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१२. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१३. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१४. मुख्याधिकारी, नगर परिषद (सर्व)
१५. मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१६. मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१७. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१८. सह सचिव / पापु-१४, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहायक
१९. पापु-१४ संग्रहासाठी.